अहवाल क्रमांक :१३९

पंचायती राज समिती

(२०१२-२०१३)

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

# महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या जालना, भंडारा व अहमदनगर जिल्हा परिषदेच्या सन २००५-२००६ च्या प्रशासन अहवालातील परिच्छेदाबाबत

चौदावा अहवाल

(सदर अहवाल दिनांक १६ एप्रिल, २०१३ रोजी विधानसभेस/ विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
२०१३

**पंचायती राज समिती**

**(२०१२-२०१३)**

**(बारावी महाराष्ट्र विधानसभा)**

**महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या जालना, भंडारा व अहमदनगर जिल्हा परिषदेच्या सन २००५-२००६ च्या प्रशासन अहवालातील परिच्छेदाबाबत**

**चौदावा अहवाल**

(तीन)

## पंचायती राज समिती
## (सन २०१२-२०१३)
## (३१ ऑक्टोबर, २०१२)

**समिती प्रमुख**

१. श्री.चंद्रकांत दानवे, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री.काशिराम पावरा, वि.स.स.

३. श्री.वैजनाथ शिंदे, वि.स.स.

४. श्री.प्रशांत ठाकूर, वि.स.स.

५. श्री.विजय खडसे, वि.स.स.

६. श्री.भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.

७. श्री.दिलीप माने, वि.स.स.

८. श्री.भारत भालके, वि.स.स.

९. श्री.उदय सामंत, वि.स.स.

१०. श्री.सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

११. श्री.बापूसाहेब पठारे, वि.स.स.

१२. श्री.आण्णा बनसोडे, वि.स.स.

१३. श्री.दादाराव केचे, वि.स.स.

१४. श्री.राजकुमार बडोले, वि.स.स.

१५. *श्री.जयकुमार रावल, वि.स.स.

१६. श्री.विष्णू सावरा, वि.स.स.

१७. श्री.संजय (बंडू) जाधव, वि.स.स.

१८. श्री.संजय राठोड, वि.स.स.

१९. श्री.सुर्यकांत दळवी, वि.स.स.

२०. श्री.प्रकाश भोईर, वि.स.स.

२१. *श्री.एम.एम.शेख, वि.प.स.

**(चार)**

२२. डॉ.सुधीर तांबे, वि.प.स.

२३. *श्री.दिपक साळुंखे, वि.प.स.

२४. श्री.विक्रम काळे, वि.प.स.

२५. श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

**निमंत्रीत**

२६. श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
श्री.भाऊसाहेब कांबळे, अतिरिक्त सचिव
श्री.गंगाधर कोहळे, उप सचिव
श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव
श्री.रंगनाथ खैरे, कक्ष अधिकारी

---

*सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली व श्रीमती उषा दराडे, वि.प.स. यांच्या रिक्त झालेल्या जागांवर श्री.एम.एम.शेख, वि.प.स. व श्री.दिपक साळुंखे, वि.प.स. यांची दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१२ रोजी पंचायती राज समितीचे समिती सदस्य म्हणून मा.सभापती, विधानपरिषद यांनी नामनियुक्ती केली आहे.

*श्री.जयकुमार रावल, वि.स.स. यांचे सदस्यत्व सभागृहाने दिनांक ३१ डिसेंबर, २०१३ पर्यंत निलंबित केले आहे.

**(पाच)**

## पंचायती राज समिती
## (सन २०१२-२०१३)
## (३१ मे, २०१२)

**समिती प्रमुख**

१. श्री.चंद्रकांत दानवे, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री.काशिराम पावरा, वि.स.स.

३. श्री.वैजनाथ शिंदे, वि.स.स.

४. श्री.प्रशांत ठाकूर, वि.स.स.

५. श्री.विजय खडसे, वि.स.स.

६. श्री.भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.

७. श्री.दिलीप माने, वि.स.स.

८. श्री.भारत भालके, वि.स.स.

९. श्री.उदय सामंत, वि.स.स.

१०. श्री.सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

११. श्री.बापूसाहेब पठारे, वि.स.स.

१२. श्री.आण्णा बनसोडे, वि.स.स.

१३. श्री.दादाराव केचे, वि.स.स.

१४. श्री.राजकुमार बडोले, वि.स.स.

१५. श्री.जयकुमार रावल, वि.स.स.

१६. श्री.विष्णू सावरा, वि.स.स.

१७. श्री.संजय (बंडू) जाधव, वि.स.स.

१८. श्री.संजय राठोड, वि.स.स.

१९. श्री.सुर्यकांत दळवी, वि.स.स.

२०. श्री.प्रकाश भोईर, वि.स.स.

२१. रिक्त

**(सहा)**

२२. डॉ.सुधीर तांबे, वि.प.स.

२३. रिक्त

२४. श्री.विक्रम काळे, वि.प.स.

२५. श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

**निमंत्रीत**

२६. श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव
श्री.गंगाधर कोहळे, उप सचिव
श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव
श्री.रंगनाथ खैरे, कक्ष अधिकारी

---

सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली, वि.प.स. व श्रीमती उषा दराडे, वि.प.स. यांची दिनांक २७ जुलै, २०१२ रोजी सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे पदे रिक्त आहेत.

**(सात)**

# पंचायती राज समिती
## (२०१०-२०११)
## (दिनांक ४ मार्च, २०१०)

**समिती प्रमुख**

१ श्री. बबनराव शिंदे, वि.स.स.

**समिती सदस्य**

२ ॲड, के.सी.पाडवी, वि.स.स.

३ श्री. माधवराव पवार, वि.स.स.

४ श्री. हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, वि.स.स.

५ श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.

६ श्री. दिलीपकुमार सानंदा, वि.स.स.

७ श्री. भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.

८ श्री. बच्चू उर्फ ओमप्रकाश कडू, वि.स.स.

९ श्री. उदय सामंत, वि.स.स.

१० श्री. बापुसाहेब पठारे, वि.स.स.

११ श्री. आण्णा बनसोडे, वि.स.स.

१२ श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

१३ श्री. खुशाल बोपचे, वि.स.स.

१४ श्री. सुरेश खाडे, वि.स.स

१५ श्री. चंद्रशेखर बावनकुळे, वि.स.स.

१६ श्री. विष्णू सावरा, वि.स.स.

१७ श्री. अनिल भैय्या राठोड, वि.स.स.

१८ श्री. विजयराव औटी, वि.स.स.

१९ श्री. दादाजी भुसे, वि.स.स.

२० श्री. नितीन भोसले, वि.स.स.

(आठ)

२१ प्रा. सुरेश नवले, वि.प.स.

२२ श्री. विक्रम काळे, वि.प.स.

२३ ॲड. उषा दराडे, वि.प.स.

२४ श्री. सय्यद पाशा पटेल, वि.प.स.

२५ श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव,
श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव,
श्री.प्र.स.मयेकर, कक्ष अधिकारी,

---

## (नऊ)

## प्रस्तावना

मी, पंचायती राज समितीचा 'समिती प्रमुख' या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरुन पंचायती राज समितीचा चौदावा अहवाल सादर करीत आहे.

सन २०१२-२०१३ करिता समिती दिनांक ३१ मे, २०१२ रोजी गठीत झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय महसुली लेखे यांच्या परीक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

सन २००५-२००६ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात सन २०१०-२०११ साठी गठीत झालेल्या समितीने जालना, भंडारा व अहमदनगर जिल्हा परिषदेची सखोल तपासणी केली.

समितीने जालना जिल्हा परिषदेस दिनांक १४ ते १६ जून, २०११ रोजी भेट देऊन श्री.बी.राधाकृष्णन, मुख्य कार्यकारी अधिकरी व श्री.किरणकुमार धोत्रे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जालना जिल्हा परिषद यांची साक्ष घेतली.

समितीने भंडारा जिल्हा परिषदेस दिनांक २१, २२ व २३ फेब्रुवारी, २०१२ रोजी भेट देऊन श्री.अरुण डुबे, मुख्य कार्यकारी अधिकारी व श्री.पंकज गिरी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी भंडारा जिल्हा परिषद यांची साक्ष घेतली.

समितीने अहमदनगर जिल्हा परिषदेस दिनांक २८, २९ फेब्रुवारी व ०१ मार्च, २०१२ रोजी भेट देऊन श्रीमती रुबल अग्रवाल, मुख्य कार्यकारी अधिकारी व श्री.कृष्णराव साळुंखे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, अहमदनगर जिल्हा परिषद यांची साक्ष घेतली.

सन २०१०-२०११ व २०१२-२०१३ करिता गठीत झालेल्या समितीने जालना, भंडारा व अहमदनगर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या तसेच साक्षीच्या वेळी संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्यांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक २९ नोव्हेंबर, २०११ रोजी जिल्हा परिषद, जालना, दिनांक ०८ ऑगस्ट, २०१२ रोजी जिल्हा परिषद, भंडारा तसेच दिनांक ०६ फेब्रुवारी, २०१३ रोजी जिल्हा परिषद, अहमदनगर संदर्भात मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या/प्रतिनिधींच्या साक्षी घेतल्या.

**(दहा)**

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीचेवेळी श्री.एस.एस.संधू, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.सुधीर ठाकरे, सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.सहारिया, अप्पर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री.टी.एस.बेंजामिन, अप्पर मुख्य सचिव, आरोग्य विभाग, श्री.व्ही.गिरीराज, प्रधान सचिव, रोहयो, श्रीमती मालिनी शंकर, प्रधान सचिव, पाणी पुरवठा विभाग, श्री.मुखर्जी, सचिव (बांधकाम), सार्वजनिक बांधकाम विभाग, श्री.भुषण गगराणी, सचिव, आरोग्य विभाग, श्री.बी.राधाकृष्णन, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना, श्री.अरुण डुबे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, भंडारा, श्री.रविंद्र पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर, श्री.द.चिं.सुर्यवंशी, मुख्य अभियंता तथा विशेष कार्य अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, श्री.गि.दि.भालेराव, सह संचालक (अतां) सार्वजनिक आरोग्य विभाग, श्री.दि.ग.मोरे, सह सचिव, ग्रामविकास विभाग श्री.कांतीलाल उमाप, उप सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, डॉ.मल्लिनाथ कलशेट्टी, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.एकनाथ मोरे, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.सुनिल चव्हाण, उप सचिव, जलसंधारण विभाग, श्री.एम.पी.तुम्मोड, उप आयुक्त (रोहयो),नाशिक, श्रीमती सीमा उकार्डे, सह सचिव, श्री.ना.रा.रौराहे, सह सचिव, श्री.जी.के.नाईक, सह संचालक, आरोग्य सेवा, श्री.ना.रा.रौराहे, सह सचिव ल.पा.वि.जि.प.अहमदनगर यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्टामध्ये दिले आहे.

वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या जालना, भंडारा व अहमदनगर जिल्हा परिषदेच्या कामकाजांची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्यांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात देण्यात आल्या आहेत.

सन २०१२-२०१३ साठी गठीत झालेल्या समितीने दिनांक    एप्रिल, २०१३ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेऊन संमत केला.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक :०९ एप्रिल, २०१३

**चंद्रकांत दानवे,**
समिती प्रमुख,
पंचायती राज समिती

(अकरा)

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरण क्रमांक | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| | | **प्रकरण एक** | |
| १ | एक | **जिल्हा परिषद, जालना** | |
| | | कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याचे अपूर्ण असलेले काम | |
| | | **प्रकरण दोन** | |
| २ | दोन | **जिल्हा परिषद, भंडारा** | |
| | | कोल्हापूर पध्दतीचा बंधारा जांभळापाणी | |
| | | **प्रकरण तीन** | |
| ३ | तीन | **जिल्हा परिषद, अहमदनगर** | |
| | | पंचायत समिती पाथर्डी | |
| | | **परिशिष्ट** | |
| | | समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त | |

**प्रकरण एक**

## जालना, जिल्हा परिषद

### १.१ कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याचे अपूर्ण असलेले काम

**समितीने जिल्हा परिषदेस दिनांक १६ जून, २०११ रोजी भेट दिली. भेटीच्या वेळी समितीस जिल्हा परिषदेकडून खालील माहिती प्राप्त झाली.**

समितीने जालना जिल्हा, परिषदेस सन २००५-२००६ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात प्रश्नावली-१ च्या अनुषंगाने दिनांक १६ जून, २०११ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी समितीस (४) कोल्हापूर पाटबंधारे मागणी रुपये ४९३.०० लाख, प्राप्त अनुदान रुपये ३२७.६२ लाख, रुपये १६५.३८ लाख कमी प्राप्त अनुदान, (५) लघु पाटबंधारे देखभाल व दुरुस्ती, मागणी अनुदान रुपये १५.०० लाख, प्राप्त अनुदान रुपये ३.४७ लाख, कमी प्राप्त अनुदान रुपये ११.५३ लाख, (६) मालगुजारी तलावांची विशेष दुरुस्ती, मागणी रुपये २२४.९२ लाख, प्राप्त अनुदान रुपये १७५.०८ लाख, कमी प्राप्त अनुदान रुपये ४९.८४ लाख प्राप्त झाले कारण नियोजनानुसार शासनाकडे रक्कमेची मागणी करण्यात आली होती. तथापि, प्रत्यक्षात शासनाकडून कमी अनुदान प्राप्त झाले असल्याची लेखी माहिती देण्यात आली.

### १.२ मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :

नियोजनानुसार शासनाकडे मागणी करुनही प्रत्यक्षात कमी अनुदान प्राप्त होण्याची कारणे काय आहेत तसेच किती कोल्हापुर पध्दतीच्या बंधाऱ्याची कामे अपुर्ण आहेत अशी समितीने विचारणा केली असता, कोल्हापूर पध्दतीच्या पाटबंधाऱ्यासाठी ४९३ लाख रुपयांची मागणी केली होती त्यापैकी फक्त रुपये ३२७ लाख एवढी रक्कम प्राप्त झाली. त्याकारणाने डीपीडीसीअंतर्गत ७६ कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांची कामे अपूर्ण आहेत, तसेच मराठवाडा विकास कार्यक्रमामधील ९५ कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्याची कामे अपूर्ण आहेत. या ७६ कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्याच्या अपूर्ण कामांमुळे ६ हजार ५५६ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येऊ शकले नाही. सन २००२-२००३ पासून लघु पाटबंधाऱ्यासाठी रुपये २ हजार ६३० लाखची मागणी होती त्यापैकी फक्त रुपये ७८५ लाख प्राप्त होते तसेच कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यासाठी रुपये २८९१ लाखची मागणी केली होती त्यापैकी फक्त रुपये १०४०.३७ लाख प्राप्त होते, म्हणजेच १८५०.७३ लाख रुपये कमी प्राप्त आहेत. तसेच मराठवाडा विकास

कार्यक्रमाअंतर्गत ४०६ कामे अपूर्ण असून त्यासाठी ४५ कोटी रुपयांची आवश्यकता आहे तसेच डीपीडीसीमध्ये निधीची मागणी केली परंतु मागणी पेक्षा कमी तरतूद प्राप्त झाली आहे असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला सांगितले. समितीने सिंचन हा विषय अत्यंत महत्वाचा असल्याने त्यास पुरेसा निधी मिळणे आवश्यक आहे व तो मागणी करुनही दिला जात नाही या प्रकरणी काही अधिकारी निलंबित आहेत व त्याची वेगवेगळ्या पध्दतीने चौकशी सुरु आहे, अपुऱ्या कामास निधीच मिळत नाही यास्तव विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात यावी असा समितीने निर्णय घेतला.

**१.३ समितीने साक्षीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून खालील मुद्यांची माहिती मागितली.**

१. कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याच्या बांधकामासाठी एकुण मागणीपैकी रुपये १६६ लाख सदर बंधारे दुरुस्तीसाठी मागणीपैकी रुपये ११.५७ लाख कमी अनुदान मिळण्याची तसेच डि.पी.डी.सी. अंतर्गत ७६, मराठवाडा विकास कार्यक्रमाअंतर्गत ९५ कोल्हापूर टाईप बंधाऱ्याची कामे अपुर्ण असण्याची काय कारणे आहेत.

२. तसेच सन २००२-०३ सालापासून लघुपाटबंधाऱ्यासाठी मागणीपैकी रुपये १८४५ लाख तसेच कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यासाठी मागणीपैकी रुपये १८५०.७३ लाख कमी अनुदान प्राप्त झाले मराठवाठा विकास कार्यक्रमांतर्गत ४.६ अपुर्णकामांना ४५ कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता असुन मालगुजारी तलावाच्या विशेष दुरुस्तीसाठी रुपये ४९.८४ लाख कमी अनुदान प्राप्त झाल्याने सदर प्रकल्प अपुर्ण आहेत, हे ही खरे आहे काय,

३. असल्यास सदर कामे पुर्ण करण्यासाठी तातडीने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाची काय भुमिका आहे.

**समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्यांची खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

१. ३१ मार्च, २०११ अखेर डि.पी.डी.सी.अंतर्गतचे ७६ को.प.बं. व मराठवाडा विकास कार्यक्रमांअंतर्गत ९५ को.प.बं.अपुर्ण आहेत सदर कामे अपुर्ण राहण्याची कामे पुढील प्रमाणे आहेत.

अ) डि.पी.डी.सी.अंतर्गतची ७६ को.प.बं.ची कामे सन १९९८-९९ पासुन वेळोवेळी कार्यारंभ आदेश दिलेली परंतु विहीत वेळेत पुर्ण न झालेली कामे आहेत.

ब) मराठवाडा विकास कार्यक्रमाअंतर्गत अपुर्ण ९५ को.प.बं.ची कामे ही सन २००५-०६ या वर्षापासूनची असुन उपलब्ध निधीच्या मार्यादेबाहेर नियोजन केल्यामुळे या कामांना निधी वेळेवर उपलब्ध न झाल्यामुळे कामे अपुर्ण आहेत.

मध्यंतरीच्या काळात या कामांच्या संदर्भात मोठ्याप्रमाणात तक्रारी आल्यामुळे विविध चौकशी समित्यांनी त्यांची चौकशी सुरु केल्यामुळे व लघुपाटबंधारे स्था:तर मंडळ औरंगाबाद यांनी आदेशीत केल्याप्रमाणे विविध तपासणी पथकामार्फत याकामांच्या संयुक्त मोजणीचे काम सुरु असल्यामुळे कामे अपुर्ण अवस्थेत आहे.

२. प्रश्नामध्ये नमुद केलेल्या रकमा या कमी मिळालेल्या निधीची एकत्रित बेरीज असुन सद्यस्थितीत लघुपाटबंधारे या लेखाशिर्षाखालील अपुर्ण कामे व त्यासाठी लागणाऱ्या निधीचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे

रुपये लाखात

| लेखाशिर्ष | कामांची संख्या | लागणारा निधी | ११-१२ साठी उपलब्ध निधी | उर्वरित लागणारा निधी |
|---|---|---|---|---|
| २७०२ लपायो.डिपीसी | ०४ | १६३.४० | १६३.४० | ----- |
| २७०२ कोपबं डिपीसी | ७६ | ४४८.३७ | ४४४.३७ | ४.०० |
| २७०२ म.वि.का. | ४०६ | ४५१३.०० | ० | ४५१३.०० |

जालना जिल्हा परिषदेकडे मालगुजारी तलाव नाहीत त्यामुळे त्याच्या दुरुस्तीसाठी कोणतीही तरतुद प्रस्तावित नाही व मंजुरही नाही.

३. डि.पी.डी.सी. अंतर्गतची कामे पुर्ण करण्यासाठी निधी उपलब्ध आहे मात्र मराठवाडा विकास कार्यक्रमाअंतर्गतची अपुर्ण कामे पूर्ण करण्यासाठी जिल्हा नियोजन समिती व शासनाकडे मागणी करण्यात आली आहे.

४. मालगुजारी तलाव प्रकरणी कोणतीही चौकशी सुरु नाही.

**१.४ विभागीय सचिवांची साक्ष :**

जिल्हा परिषद स्तरावर प्राप्त माहिती व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या साक्षी दरम्यान आढळलेल्या त्रुटींबाबत समितीने अधिक व वस्तूनिहाय माहिती घेण्यासाठी दिनांक २९ नोव्हेंबर, २०११ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीमध्ये विभागीय सचिवांनी असे सांगितले की, कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांच्या कामासाठी जिल्हा परिषदेस अतिशय कमी प्रमाणात अनुदान प्राप्त झाले. मराठवाडा विकास कार्यक्रमाअंतर्गत २००६-०७, २००७-०८, २००८-०९, २००९-१० या कालावधीत एकूण ६०२ कामे हाती घेतली होती. त्या कामासाठी ७५ कोटी रुपये एवढे अनुदान आवश्यक होते. प्रत्यक्षात १३ कोटी रुपये एवढेच अनुदान प्राप्त झाले. कामाच्या तुलनेत अनुदान कमी प्राप्त झाल्यामुळे अपूर्ण कामांची संख्या मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे असा जलसंधारण विभागाच्या प्रतिनिधींनी साक्षीच्या वेळी खुलासा केला. त्यानंतर मराठवाडा विकास कार्यक्रमाचा तीन वर्षाचा कार्यक्रम होता. पहिल्याच वर्षी २ कोटी ८५ लाख रुपये व नंतर ४ कोटी ४४ लाख रुपयांचा निधी मिळाला. पहिल्या वर्षी प्राप्त रुपये २ कोटी ८५ लाखाच्या निधीतून २ कोटी ४० लाखाच्या कामांना मंजुरी घेतली गेली. मागच्या वर्षातील कामे पूर्ण करण्यासाठी व नवीन हाती घेतलेल्या कामासाठी फक्त रुपये १० कोटी प्राप्त झाले त्यापध्दतीने कामे हाती घेतली पहिल्या वर्षी रुपये ३ कोटी दुसऱ्या वर्षी रुपये १० कोटी आणि तिसऱ्या वर्षी १०० कोटी रुपयांची तरतूद मराठवाडा विकास कार्यक्रम अंतर्गत मराठवाड्यातील संपूर्ण जिल्ह्यांसाठी केली गेली. जेवढ्या प्रमाणात कामे मंजूर केली गेली, तेवढ्या प्रमाणात निधी उपलब्ध झाला नाही, त्यामुळे कामे अपूर्ण रहिली. पहिल्या वर्षी जालना जिल्ह्यासाठी वेगळा निधी मिळाला होता. परंतु दुसऱ्या वर्षी तो मराठवाड्यातील संपूर्ण जिल्ह्यांसाठी मिळाला आणि तिसऱ्या वर्षी रुपये १०० कोटींचा प्राप्त निधी मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांत विभागला गेला, त्यामुळे जालना जिल्ह्यास कमी निधी प्राप्त झाला. रुपये ७५ कोटींची कामे मंजूर होती. त्यातील रुपये १७ कोटीची कामे रद्द करून देखील रुपये ५८ कोटीची कामे मंजूर होती. या अपूर्ण असलेल्या कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्याची कामे पूर्ण करण्यासाठी पहिल्या वर्षी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध झाला नाही. पुढील वर्षीही पाहिजे तेवढा निधी उपलब्ध झाला नाही. आता या कामांसाठी रुपये १३ कोटी १९ लाख रुपये मिळाले असून त्या

निधी अंतर्गत कामे पूर्ण करण्यात येत आहेत. साधारणत: रुपये २५ ते २६ कोटींची कामे सुरु केली आहेत तसेच अपूर्ण कामे व त्यात झालेली अनियमितता याबाबत विभागीय सचिवानी सदरहू कामांची चौकशी करण्यात येत आहे अशी साक्षीच्या वेळी समितीस माहिती दिली. समितीने जादा मंजूर कामांची माहिती जिल्हा परिषदेस अवगत करणे आवश्यक होते या समितीच्या मताशी विभागीय सचिव सहमत झाले

विभागीय सचिवांनी पुढे ज्यांनी कामे पूर्ण केलेली आहेत, त्यांना १३ कोटी रुपये मिळालेले आहेत. आता अपूर्ण कामे पूर्ण करण्यास सुरुवात केलेली आहे. मध्यंतरीच्या कालावधीत कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांच्या कामांच्या बाबतीत तक्रारी प्राप्त झाल्या होत्या, त्याची विशेष चौकशी मुख्य कार्यकारी अधिकारी स्तरावर सुरु असल्याचे समितीस सांगितले. तसेच चौकशी अंती ९६ कामांचे संयुक्त मोजणी चौकशी अहवाल प्राप्त झाले आहेत. ५३ कामांमध्ये अनियमितता आढळून आलेली नाही. ४३ कामांमध्ये तफावत आढळून आली आहे. तफावतीची रक्कम १२ लाख ३३ हजार रुपये एवढी आहे. आतापर्यंत अजूनही संयुक्त मोजणीचे २५ टक्के काम झाले आहे व उर्वरीत काम बाकी आहे असा विभागीय अधिकारी यांनी समितीसमोर खुलासा केला. तसेच एकुण मंजूर ४७५ कामांपैकी ६९ कामे पूर्ण झाली आहेत. उर्वरित ४०६ कामे प्रगतीपथावर आहेत. या सर्व कामांची तपासणी सुरु आहे ती लवकरात लवकर पूर्ण करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

४०६ अपूर्ण कामांसाठी एकूण ५८ कोटी रुपयांचा निधीची आवश्यकता आहे त्या कामांची तपासणी सुरु आहे. या तपासणी अंतर्गत जे कोणी अधिकारी, कर्मचारी दोषी आढळून आले, त्या कामांची चौकशी सुरु असुन त्यात आढळेल्या दोषींविरुद्ध कारवाई केली गेली पाहिजे, या समितीच्या मागणीनुसार खुलासा करताना, या कामांच्या बाबतीत गंभीर स्वरुपाच्या तक्रारी आल्या होत्या, त्यामुळे या कामांचा दर्जा तपासणीचे काम अधिक्षक अभियंता करीत आहेत. यातील ६९ कामे पूर्ण झाली आहेत. उर्वरित ४०६ कामे अपूर्ण असून त्या कामांसाठी ३५ कोटी २५ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. परंतु तेवढ्या तरतुदीत ती कामे पूर्ण होणार नाहीत. ती विभागाच्या तरतुदीतून पूर्ण करावी लागतील त्यानंतर चौकशीत दोषी असलेल्या अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई केली जाईल. एकूण ५८ कोटींची कामे असून त्यातील ३५ कोटींची कामे झाली आहेत, अजून २३ कोटी रुपयांची आवश्यकता आहे. त्यातुन काही

प्रमाणात कामे पूर्ण होतील. उर्वरित कामांसाठी वेगळ्या योजनेतून निधी उपलब्ध करुन घ्यावा लागेल. या ४०६ कामांपैकी ९६ कामांची तपासणी अहवाल प्राप्त झाला आहे, उर्वरित ३०० कामांचा तपासणी अहवाल प्राप्त व्हावयाचा आहे. अधिक्षक अभियंता यांच्या स्तरावरुन सदरहू कामांच्या तपासणीचे काम सुरु असून ते येत्या तीन महिन्यात पूर्ण करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी साक्षीच्या वेळी स्पष्ट केले.

तसेच २० टक्के काम झाले असेल अशी कामे, त्याचप्रमाणे १० टक्क्यापेक्षा कमी खर्च झाला असेल अशी कामे वगळून या कामांचा चौकशी अहवाल समितीला येत्या तीन महिन्यात सादर करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी साक्षीच्या बैठकीच्या शेवटी समितीस विदीत केले. ही सर्व कामे डी.पी.डी.सी.च्या स्तरावरील आहेत. त्यासाठी देण्यात आलेल्या निधीतून सुरु आहेत. त्यामुळे उपलब्ध निधीतून ही कामे घेता येणार नाहीत. तथापि, याबाबतीत वाढ कशी करता येईल यादृष्टीकोनातून माननीय पालकमंत्र्यांच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येतील असे विभागीय प्रतिनिधींनी साक्षीचा समारोप करतांना समितीस अवगत केले.

**१.५ अभिप्राय व शिफारशी :**

समितीने जिल्हा परिषदेस भेट दिली, त्यावेळी समितीस डी.पी.डी.सी. अंतर्गत कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याची व मराठवाडा विकास कार्यक्रमांतर्गत कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यांची अपूर्ण कामे तसेच त्यासाठी मागणी केलेली रक्कम व प्राप्त रक्कम या माहितीच्या अनुषंगाने समितीस विभागीय सचिवांची साक्ष घेतली त्यात समितीस तफावत आढळून आली. भेटी तसेच साक्षीच्या वेळी समितीस देण्यात आलेली माहिती विसंगत होती. त्यात समन्वयाचा फारच अभाव आढळून आला. अपुऱ्या निधीमुळे कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यांची कामे पूर्ण झालेली नव्हती अशीही समितीस माहिती प्राप्त झाली. निधीचे वितरण करताना शासनाने एकदा एका जिल्हयासाठी व त्यानंतर संपूर्ण मराठवडा विभागासाठी दिला होता. त्यामुळे जिल्हा परिषदेस कमी निधी प्राप्त झाला होता. त्याकारणाने बरीच कामे प्रलंबित तसेच अपूर्ण राहिली.

अपुर्ण कामांची जिल्हा परिषद स्तरावर तपासणी सुरु झाली होती. त्यात जिल्हा परिषदेचे अधिकारी व कर्मचारी दोषी आढळून आले. त्या कामाची तपासणी सुरु असून, त्याबाबत समितीने अधिक चौकशी केली असता, त्याकामांबाबत गंभीर स्वरुपाच्या तक्रारी

आढळून आल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. त्याकामांची चौकशी पूर्ण करुन अहवाल येत्या तीन महिन्यात सादर करावा असे समितीने विभागीय सचिवांच्या बैठकीत सुचित करुनही अद्याप त्यानुसार जिल्हा परिषदेने समितीस अहवाल सादर केलेला नाही.

**समितीच्या असे निदर्शनास आले की, कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याची एकूण ४७५ कामे होती. त्यापैकी केवळ ६९ कामेच पूर्ण झालेली असून ४०६ कामे अद्यापही अपूर्ण आहेत. सदर ४०६ कामांसाठी रुपये ३५ कोटी २५ लाख एवढी तरतूद केलेली असून रुपये ५८ कोटींची आवश्यकता आहे.**

**उक्त कामांमध्ये अनियमितता व गैरव्यवहार झाल्याप्रकरणी चालू असलेल्या चौकशीमध्ये केवळ ९६ कामांचा संयुक्त मोजणी अहवाल प्राप्त झालेला आहे. त्यापैकी ४३ कामांमध्ये तफावत आढळलेली असून सदर कामांमधील तफावतीची रक्कम रुपये १२ लाख ३३ हजार एवढी आहे. उर्वरित कामांची चौकशी चालू आहे असेही समितीच्या निदर्शनास आले.**

**समितीच्या मते, गत सहा वर्षांच्या कालावधीतील ही कामे असून यामध्ये जादा कामे मंजूर करण्यात आलेली आहेत हीच मुळात चूक करण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर जादा कामे कोणत्या अधिकाऱ्याने मंजूर केली, याची चौकशी करुन संबंधितावर जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे सद्य:स्थितीमध्ये अपूर्ण असणाऱ्या कामांसाठी लागणाऱ्या जादा निधीसाठी प्रयत्न करणेही आवश्यक आहे.**

**समितीस प्रथम भेटीच्या वेळी व त्यानंतर साक्षीच्या वेळी प्राप्त अनुदान, मंजूर कामे व अपूर्ण कामे यात आढळलेल्या विसंगतीबाबत समिती आश्चर्य व्यक्त करीत आहे. तसेच साक्षीच्या वेळी विभागीय सचिवांनी तीन महिन्यांच्या कालावधीत अहवाल सादर करण्याबाबत दिलेल्या आश्वासनांनुसार अहवाल सादर न झाल्याप्रकरणी समिती नापसंती व्यक्त करीत आहे.**

**सदर प्रकरणी चालू असलेल्या चौकशीची संथगती, चौकशीत अंतर्भूत कामांची संख्या याबाबी विचारात घेता, समिती शिफारस करते की, अधिक्षक अभियंता स्तरावर सुरु असलेल्या कामांच्या तपासणीचा व चौकशीच्या कामाचा वेग वाढविण्यात यावा. सदर चौकशी एक महिन्याच्या आत पूर्ण करण्यात यावी. त्याचप्रमाणे संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्यात यावी.**

समिती अशी शिफारस करते की, केवळ २० टक्के काम झाले असेल अशी कामे व १० टक्क्यांपेक्षा कमी खर्च झाला असेल अशी कामे वगळण्यात यावीत व उर्वरित अपुर्ण कामे पूर्ण करण्यासाठी डी.पी.डी.सी.च्या तसेच विभागाच्या इतर योजनांमधून निधी उपलब्ध करुन घेण्यात यावा.

समिती अशीही शिफारस करते की, उक्त प्रकरणी शासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस दोन महिन्यांच्या आत कळविण्यात यावी.

## प्रकरण दोन

## जिल्हा परिषद, भंडारा

### २.१ कोल्हापूर पध्दतीचा बंधारा जांभळापाणी :-

भंडारा जिल्हा परिषदेच्या सन २००४-२००५ या वर्षातील वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्रमांक १ बाबत पाटबंधारे विभाग सदर्भात (लघुपाटबंधारे स्थानिक क्षेत्र) जिल्हा परिषदेकडून खालील प्रमाणे माहिती मागविण्यात आली.

१. जिल्हा परिषदांमार्फत कार्यान्वित करण्यात येणाऱ्या (लघुपाटबंधारे स्थानिक क्षेत्र) योजनेअंतर्गत कोणकोणत्या योजनांचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे. या कार्यक्रमांतर्गत सन २००५-२००६ या कालावधीत किती योजना पूर्ण करण्यात आलेल्या आहेत व त्यावर किती खर्च करण्यात आला,

२. मार्च, २००९ अखरेपर्यंत किती व कोणकोणत्या योजना त्यांच्या पूर्णत्वासाठी निश्चित केलेल्या कालावधीपेक्षा जास्त काळ अपूर्णावस्थेत आहेत व त्या अपूर्णावस्थेत राहण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

३. अपूर्णावस्थेत असलेल्या योजनावर योजनानिहाय आजपावेतो प्रत्यक्षात किती खर्च झालेला आहे व या योजना पूर्ण करण्यासाठी आणखी किती रक्कम अपेक्षित आहे, अपूर्णावस्थेत असलेल्या योजनांवर केलेला खर्च वाया गेला आहे काय असल्यास, किती ?

४. अपूर्णावस्थेत असलेल्या योजनांमधून किती क्षेत्र सिंचनाखाली येणे अपेक्षित होते व या योजना शीघ्रतेने पूर्ण करण्यासाठी काय उपाययोजना करण्यात आली आहे,

५. पूर्ण झालेल्या योजनांपैकी किती योजना नादुरुस्त अवस्थेत आहेत तसेच गाळ साचल्यामुळे किती योजना निरुपयोगी ठरलेल्या आहेत, सदर योजना नादुरुस्त असण्याची कारणे काय आहेत,

६. नादुरुस्त असलेल्या योजना दुरुस्त करण्यासाठी तसेच गाळ साचलेल्या योजनांतील गाळ काढून त्या सुस्थितीत आणण्याच्या दृष्टीने काय उपाययोजना करण्यात आली आहे व येत आहे,

७. जिल्हा परिषदेअंतर्गत बंधाऱ्याच्या अपूर्ण कामांची संख्या किती आहे, कामे अपूर्ण असण्याची कारणे काय आहेत, ती केव्हापासून अपूर्ण आहेत, या अपूर्ण कामांवर आजपर्यंत किती खर्च झालेला आहे, पूर्ण झालेल्या बंधाऱ्यापैकी किती बंधारे प्रत्यक्षात वापरात आहेत, वापरात नसणाऱ्या बंधाऱ्याची संख्या किती व त्यांची कारणे काय आहेत ?

**उपरोक्त माहिती प्रकरणी जिल्हा परिषदेने खालील प्रमाणे खुलास केला :**

जिल्हा परिषदामार्फत कार्यान्वित करण्यात येणाऱ्या (लघुपाटबंधारे स्थानिक क्षेत्र) योजनेअंतर्गत लघुसिंचन तलाव, को.पू.बंधारे/साठवण बंधारे बांधकाम व मा.मा.तलावांची विशेष दुरुस्ती या योजनांचा समावेश आहे.

सन २००५-२००६ वर्षात ३ बंधाऱ्याची कामे पूर्ण झालेली असून त्यावर रु.११.८६ लक्ष खर्च झाला आहे.

मार्च २००९ अखेर ३ को.प.बंधाऱ्याची कामे पूर्णत्वासाठी निश्चित केलेल्या कालावधीपेक्षा जास्त काळ अपूर्णावस्थेत आहेत.

अपूर्ण ३ को.प.बंधाऱ्यापैकी २ बंधाऱ्याची कामे प्रगतीपथावर असून उर्वरित १ बंधाऱ्याचे कामाचे अनियमिततेबाबत चौकशी व सुधारित मंजूरीसाठी अपूर्णावस्थेत होते.

सद्य:स्थितीत को.प.बंधारा नानोरी व जांभळीचे काम पूर्ण झालेले असून जांभळापाणी को.प.बंधाऱ्याचे मागे व पुढे कृषी विभागाची बंधारे असल्यामुळे सदर बंधाऱ्याचे उर्वरित काम करणे व्यवहारीक नसल्यामुळे बंधारे आहे त्या स्थितीत पूर्ण करण्याचा प्रस्ताव मा.अधिक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्तर) नागपूर यांना सादर केलेला आहे.

अपूर्ण अवस्थेतील योजनांवर प्रत्यक्षात झालेला खर्च व योजना पूर्ण करण्यास अपेक्षित खर्च खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | तालुका | अंदाजित किंमत | झालेला खर्च | अपेक्षित खर्च | अपूर्ण असल्याची कारणे |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | को.प.बंधारा जांभळापाणी | मोहाडी | १४.७७ | २.७२ | १२.०५ | कामाचे अनियमिततेबाबत चौकशी व सुधारीत मंजूरीसाठी प्रलंबीत होते. |
| २ | को.प.बंधारा नानोरी | लाखनी | २०.६४ | १६.५२ | - | काम पूर्ण |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | को.प.बंधारा जांभळी | साकोली | ५७.१९ | ५६.८३ | -- | काम पूर्ण |

अपूर्णावस्थेतील योजनांवरील खर्च वाया गेलेला नाही. योजना पूर्ण झाल्यावर सिंचनासाठी त्याचा उपयोग होणार आहे.

सद्य:स्थितीत २ को.प.बंधारे पूर्ण झाल्यामुळे १४० हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झालेली आहे व त्याचा उपयोग सिंचनासाठी झालेला आहे.

अपूर्ण अवस्थेत असलेल्या योजनांपासून १८० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली अपेक्षित आहे.

अपूर्ण असलेल्या ३ को.प.बंधाऱ्यापैकी २ को.प.बंधाऱ्याची कामे प्रगतीपथावर असून उर्वरित १ कामाचे अनियमिततेबाबत चौकशी पूर्ण झाल्यावर व सुधारित मंजूरी मिळाल्यानंतर काम पूर्ण करावयाचे होते.

सद्य:स्थितीत २ को.प.बंधाऱ्याचे काम पूर्ण झालेले असून त्यापासून १४० हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झालेली आहे.

पूर्ण झालेल्या योजनांपैकी ३ ल.पा.तलाव नादुरुस्त अवस्थेत आहेत. त्यापैकी ल.पा.तलाव देवरी (गोंदी) हे अतिवृष्टीमुळे क्षतीग्रस्त झालेले असून ल.पा.तलाव पीटेझरी व ल.पा.तलाव

उमरझरी यामधून झिरपा होत असल्याने तलावत पाणीसाठा राहात नाही.

गाळ साचल्यामुळे निरुपयोगी ठरलेल्या योजना या विभागाकडे नाहीत.

नादुरुस्त असलेले ल.पा.तलाव दुरुस्त करण्यासाठी Repairs, Renovation & Restoration of water Bodies अंतर्गत प्रस्तावित करण्यात आलेले आहे

या विभागांतर्गत मार्च, २००९ अखेरे ३ को.प.बंधाऱ्यांची कामे अपूर्ण असून ती सन १९९८ पासून अपूर्ण होते. ३ अपूर्ण को.प.बंधाऱ्यांपैकी २ को.प.बंधाऱ्यांची कामे प्रगती पथावर असून १ को.प.बंधाऱ्याचे काम कामाचे अनियमिततेबाबत चौकशी सुरु आहे व सुधारित मंजूरीसाठी प्रलंबीत आहे. या कामांवर रु.५९.९२ लक्ष खर्च झालेला आहे.

सद्य:स्थितीत २ को.प.बंधाऱ्याचे काम पूर्ण झालेले असून त्यापासून १४० हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झालेली आहे.

या विभागांतर्गत मार्च, २००९ पर्यंत १७७ को.प.बंधारे व ८१ साठवण बंधाऱ्यांची कामे पूर्ण करण्यात आली. सद्य:स्थितीत १७९ को.प.बंधारे व १०३ साठवण बंधाऱ्यांची कामे पूर्ण झ ालेली असून त्यापैकी १७९ को.प.बंधारे व १०३ साठवण बंधारे वापरात आहेत.

को.प.बंधाऱ्याचे बांधकाम U.C.R.Massonary (दगडी बांधकाम) मध्ये असल्यामुळे व १५ वर्षाचे वर कालावधी झाल्यामुळे त्यामधून पाण्याचा झिरपा होतो. तसेच फळ्यासुध्दा नादुरुस्त
झालेल्या आहेत. त्यामुळे को.प.बंधाऱ्यापासून पूर्णपणे सिंचनक्षमतेएवढे सिंचन होत नाही.

राष्ट्रीय समविकास योजने अंतर्गत ३५ को.प.बंधारे दुरुस्त करण्यात आले, त्यावर रु.१४९.८० लक्ष खर्च झाला व ११५७ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झालेली आहे.

**२.२ मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :**

पंचायती राज समितीने दिनांक २३/२/२०१२ रोजी जिल्हा परिषद, भंडारा येथे भेट देऊन मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी जांभळापाणी येथील कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याबाबत समितीला माहिती देण्यात यावी, यावर जांभळापाणी येथील कोल्हापूर बंधाऱ्याच्या कामामध्ये अनियमितता झाली असून अनियमिततेबाबत चौकशी करुन त्याचा अहवाल आयुक्तांकडे सादर करण्यात आला आहे असे कार्यकारी अभियंता (ल.पा.) यांनी समितीस सांगितले तथापि समितीने अशी विचारणा केली की, सदरहू कामामध्ये निश्चित काय अनियमितता झाली आहे. यावर श्री.एम.एच.सार्वे, शाखा अभियंता यांनी दिलेल्या सूचनाचे उल्लंघन केले आहे. सदरहू बंधाऱ्याची पाहणी केली असता सन १९९६-९७ या वर्षात फांऊडेशन कॉंक्रीट पर्यंत खोदकाम झाल्याबाबत मोजमाप पुस्तिका क्र. ११६० मधील पृ.क्र.६२ ते ७५ वर अहवालानुसार रु.९,६१,७०४/- चे कामच झालेले नाही असे निदर्शनास आले, यासंदर्भातील चौकशीचा अहवाल दिनांक १७ ऑक्टोबर, २०११ रोजी आयुक्तांकडे पाठविण्यात आला आहे असे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस सांगितले. यावर समितीने अशीही विचारणा केली की, सदरची चौकशी कोणी केली व चौकशीत निश्चित काय आढळून आले यासंदर्भात सदरची चौकशी कृषी अधिकारी यांनी केली आहे. मा. अधिक्षक अभियंता (ल.पा.स्त.स्तर) मंडळ नागपूर यांनी दि.१६/५/२००६ रोजी को.प.बंधारा ता.मोहाडी, जिल्हा, भंडारा, पूर्वी झालेल्या कामाची व प्रस्तावित कामाची प्रत्यक्ष पाहणी केली. त्यासंबंधाने

पूर्वी झालेल्या कामासंदर्भात गरज भासल्यामुळे संयुक्त गटाची नियुक्ती करण्यात आली. संयुक्त मोजणी गटाने दिनांक २ जून, २००६ रोजी मोक्यावर जावून पंचनामा करुन संयुक्त मोजणीचे काम केले त्यावेळेस श्री.सार्वे, शाखा अभियंता तसेच गावकरीसुध्दा उपस्थित होते. कृषी विकास अधिकारी यांनी केलेल्या चौकशीत आरोप क्र. १ व ३ अंशत: सिध्द होत असून आरोप क्र.२ संयुक्तरित्या सिध्द होत असल्याचे अहवाल नमूद करण्यात आले आहे असे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला सांगितले. संबंधित शाखा अभियंता सध्या सेवेत कार्यरत आहेत काय यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सेवेत असल्याचे सांगितले. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करुन याबाबतची माहिती समितीला १५ दिवसांत सादर करण्यात यावी असे समितीने निदेश दिले.

**२.३ उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने खालील मुद्यांसदर्भात अधिक माहिती विभागाकडून मागविली.**

सन १९९६-९७ मध्ये जांभळापाणी तालुका मोहाडी येथे बांधण्यात आलेल्या कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याचे काम न करता रुपये ९,६२,७०४/- एवढ्या रकमेचे देयक अदा करण्यात आल्याप्रकरणी श्री.एच.एम.सार्वे, शाखा अभियंता, लघुपाटबंधारे जिल्हा परिषद, पाटबंधारे विभाग यांनी पाठविलेल्या चौकशी अहवालाच्या अनुषंगाने त्यांच्यावर काय कारवाई केली याची माहिती समितीस देण्यात यावी.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात विभागाने खालीलप्रमाणे माहिती सादर केली.**

अधिक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्तर) मंडळ नागपूर यांचे गोपनीय पत्र क्र.६७, दिनांक ६ मार्च, २००७ मध्ये आदेशीत केल्यानुसार श्री.एच.एम.सार्वे, शाखा अभियंता हे वर्ग ३ चे कर्मचारी असल्यामुळे विषयांकित अनियमितते प्रकरणी जिल्हा परिषदेचे आदेश क्रमांक भंजिप/लपा/आस्था-१/१५२५/०८, दिनांक २१/६/२००८ नुसार त्यांना निलंबीत करण्यात आले. तसेच त्यांचे विरुध्द शिस्तभंग विषयक कारवाई सुरु करुन त्यांना दोषारोप पत्र बजावण्यात आलेले आहे.

सदर दोषारोपाचे बाबतीत चौकशी अधिकारी तथा जिल्हा कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद, भंडारा यांनी सदर आरोप हा संयुक्तिकरित्या सिध्द होते असे अभिप्राय नोंदविलेले आहे.

त्यामुळे सदर प्रकरणात समाविष्ट असलेले सेवानिवृत्त श्री.नगराळे, तत्कालीन कार्यकारी अभियंता व श्री.श्रीवास्तव, तत्कालीन उपविभागीय अभियंता यांचेवर निलंबन निधी रुपये १,३५,३७४/- ची जबाबदारी टाकण्यात यावी किंवा कसे याबाबतचे मार्गदर्शन मा. आयुक्त, नागपूर विभाग, यांना या जि.प.चे पत्र क्र.भंजिप/लपा/आ-१/१२९५, दिनांक १७/१०/२०११ नुसार लघुसिंचन विभागाकडून मागविण्यात आले होते.

त्यावर मा. आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांचे पत्र क्र.विशा/कार्या १० (७) कावि १७/२०१२, दिनांक ७/१/२०१२ नुसार सदर प्रकरणात समाविष्ट असलेले अधिकारी हे वर्ग १ चे अधिकारी असल्यामुळे शासनाचे मार्गदर्शन घेण्याचे निर्देशित केले.

त्यानुसार या जिल्हा परिषदेचे पत्र क्र.भंजिप/लपा/आस्था-१/१०६२/१२, दिनांक ३०/०४/२०१२ नुसार शासनास मार्गदर्शन मागविण्यात आले असुन मार्गदर्शन/पुढील आदेश अप्राप्त असल्याने या जिल्हा परिषदेचे पत्र क्रमांक भंजिप/लपा/आस्था-१/१६०३/२०१२, दिनांक ४/८/२०१२ नुसार विषयांकित प्रकरणी पुन्हा शासनास विनंती करण्यात आलेली आहे.

**२.४ विभागीय सचिवांची साक्ष :**

पंचायती राज समितीने जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या संदर्भात समितीने दिनांक ८ ऑगस्ट, २०१२ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, दिनांक १७/१०/२०११ रोजी लघुपाटबंधारे विभागाने पाठविलेल्या चौकशी अहवालांच्या संदर्भात संबंधितांवर कोणती कारवाई केली. यासंदर्भात रु.९,६२,७०४/- या ऐवजी रु.९६,१७,७००/- असे वाचावे अशी दुरुस्ती मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केली, तर तीन अधिकाऱ्यांपैकी अभियंता व उपअभियंता असे दोन अधिकारी सेवानिवृत्त झालेले आहेत याप्रकरणी जबाबदारी निश्चित करण्यासाठी विभागीय आयुक्ताकडे प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे सदरची बाब शासनस्तरावर प्रलंबित असून याप्रकरणी तीन महिन्यांत कार्यवाही केली जाईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

**२.५ अभिप्राय व शिफारशी :**

जांभळापाणी कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याच्या कामात शाखा अभियंता यांनी दिलेल्या सुचनांचे उल्लंघन केले आहे. बंधाऱ्याचे खोदकाम फाउंडेशन कॉंक्रीट पर्यंत करण्यात आल्याचे मोजमाप पुस्तिकेत नोंद करुन काम झाल्याचे दाखवून देयक घेण्यात आले तथापि, चौकशी

अंती काम झाले नसल्याचे आढळून आले यासंदर्भात केलेल्या चौकशीत संयुक्तरित्या दोषी आढळून आलेल्या दोषी व्यक्तींपैकी दोघेजण सेवानिवृत्त झाले आहेत तर एक सेवेत आहेत याप्रकरणी दोषी आढळून आल्यावर संबंधितांवर तात्काळ कारवाई करणे आवश्यक होते परंतु अद्याप दोषींवर जबाबदारी निश्चित करण्यात आली नाही. या बांधकामात रुपये ९६,१७,०००/- इतक्या रक्कमेचा गैरव्यवहार झाल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. सदरचे प्रकरण शासनस्तरावर प्रलंबित आहे. शासनाने याप्रकरणी कारवाई करुनच समितीसमोर साक्ष देण्यासाठी येणे आवश्यक होते. तथापि, तसे न करता तीन महिन्यात निर्णय घेण्यात येईल असे समितीला सांगितले जाते. शासन याप्रकरणी वेळकाढूपणा करीत असून दोषींवर कारवाई करण्यास टाळाटाळ करीत असल्याचे समितीचे स्पष्ट मत झाले आहे.तसेच बंधाऱ्याचे बांधकाम सध्या: अपुर्ण अवस्थेत आहे. त्यास विलंब झाला असुन सुधारित मंजुरीसाठी प्रलंबित आहे. उपरोक्त प्रकरणी तात्काळ निर्णय घेऊन काम पूर्ण करणे आवश्यक होते. तथापि, तसे न करता प्रकरण प्रलंबित ठेवले व त्यामुळे बंधाऱ्याच्या बांधकामाचा खर्च वाढणार आहे, या बद्दल समिती खेद व्यक्त करीत आहे.

**समिती अशी शिफारस करते की, उपरोक्त प्रकरणी दोषी असणाऱ्यांवर तात्काळ जबाबदारी निश्चित करण्यात यावी तसेच त्यांच्याकडून प्रत्यक्षात काम झाले नाही परंतु निधी खर्च केल्याचे दाखविले आहे अशी खर्चाची रक्कम व्याजासहित दोषींकडून वसुल करण्यात यावी तसेच बंधाऱ्याच्या कामास सुधारित मान्यता देऊन बंधाऱ्याचे काम लवकरात लवकर पुर्ण करण्यात यावे व याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला दोन महिन्यात सादर करण्यात यावी.**

## प्रकरण तीन

## जिल्हा परिषद, अहमदनगर

## पंचायत समिती पाथर्डी

**३.१** अहमदनगर जिल्हा परिषद सन २००५-२००६ या वर्षातील वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्रमांक २ संदर्भात खालीलप्रमाणे लेखी माहिती मागविण्यात आली.

अ) पंचायत समितीमध्ये सन २००५-२००६ मध्ये गैरव्यवहाराची किती प्रकरणे उघडकिस आली. प्रकरण निहाय गैरव्यवहाराचे स्वरुप काय आहे व त्यात गुंतलेली रक्कम तसेच अधिकारी/कर्मचारी किती आहेत व यापैकी किती प्रकरणे निकालात काढण्यात आली.

ब) प्रलंबित प्रकरणांपैकी किती प्रकरणांची चौकशी झाली आहे व किती प्रकरणे जिल्हा परिषदेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आली आहे.

क) सन २००५-२००६ पुर्वी उघडकिस आलेली परंतु अद्याप निकालात न निघालेली प्रकरणे किती व ती प्रलंबित राहाण्याची कारणे काय आहेत.

ड) वरील क मध्ये विचारलेल्या प्रकरणांपैकी जुन्यात जुनी प्रकरणे केव्हा पासुनची आहेत.

**उपरोक्त प्रकरणी गटविकास अधिकारी यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

पंचायत समितीमध्ये सन २००५-०६ अंतर्गत गैरव्यवहाराची दोन प्रकरणे उघडकीस आली आहे. सदर प्रकरणांमध्ये वसुल रक्कम कमी जमा करुन तसेच प्रमाणकाशिवाय खर्च करुन अपहार केलेला आहे. सदर प्रकरणांमध्ये गुंतलेले ग्रामसेवक यांची संख्या तीन आहे. सदर प्रकरणांमध्ये कायमस्वरुपी अपहार रक्कम ५,९३९ असुन संशयीत अपहार रक्कम रु.५४,५३२ आहे. सदर प्रकरणी वसुली करिता कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

प्रलंबित प्रकरणांपैकी ३७ प्रकरणांमध्ये चौकशी झाली असुन २२ प्रकरणांमध्ये वसुली पुर्ण करण्यात आली आहे.

सन २००५-०६ पुर्वी उघडकिस आलेली प्रकरणे ३० असुन त्यापैकी १५ प्रकरणे वसुली न झाल्याने प्रलंबित आहेत. सदर प्रकरणातील गुंतलेले अधिकारी पदाधिकारी मयत आहेत व त्यांचे वारसाबाबत तपास सुरु आहे.

वरील क मध्ये विचारलेल्या प्रकरणांपैकी जुन्यात जुनी प्रकरणे सन ६१-६२ पासुनची आहेत.

**३.२ गट विकास अधिकारी, पाथर्डी यांची साक्ष :**

समितीने दिनांक २९ फेब्रुवारी, २०१२ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी गटविकास अधिकारी यांची साक्ष घेतली साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, अहवाल वर्षात गैरव्यवहाराची किती प्रकरणे होती व त्यांची सद्य:स्थिती काय आहे. यावर अहवाल वर्षात गैरव्यहाराची दोन प्रकरणे उघडकिस आली होती व त्यामध्ये तीन ग्रामसेवक गुंतले होते. एका प्रकरणात वसुली पुर्ण करण्यात आली आहे त्यापैकी एक ग्रामसेवक अहमदनगर पंचायत समितीमध्ये कार्यरत आहे तर दोन ग्रामसेवक निलंबित आहेत. पंचायत समितीमध्ये एकुण गैरव्यवहाराची ४२ प्रकरणे वसुलीची कार्यवाही चालू आहे असे विस्तार अधिकारी यांनी समितीला सांगितले. यावर समितीने अशीही विचारणा केली की ६९ लाख रुपयांचा गैरव्यवहार केलेल्या प्रकरणांची सद्य:स्थिती काय आहे यावर सदरच्या ग्रामसेवकाला निलंबित करण्यात आले असुन त्यांचेवर आरोपपत्र दाखल केले आहे. तसेच विभागीय स्तरावर सहाय्यक आयुक्त याप्रकरणी चौकशी करीत आहेत. सदरच्या ग्रामसेवकाला पुन्हा कामावर घेतले हे कितपत योग्य आहे अशी समितीने विचारणा केली असता यावर श्री.बी.एम.रणसिंग हे जामखेड पंचायत समितीमध्ये कामाला असताना त्यांनी अपहार केल्यामुळे त्यांना बडतर्फ करण्यात आले होते. परंतु शासन आदेश आल्यावर परत कामावर घेण्यात आले त्यानंतर ते पंचायत समिती पाथर्डीमध्ये कामावर असताना त्यांनी पंचायत समिती क्षेत्रातील पाच ग्रामपंचायतीमध्ये निरनिराळ्या योजनांमध्ये ९२ लाखांचा अपहार केला आहे, असे विस्तार अधिकारी यांनी समितीस सांगितले. यासंदर्भात एका ग्रामसेवकाने ९२ लाखांचा अपहार केल्याप्रकरणी बडतर्फ करुन पुन्हा कामावर घेण्यात आल्याप्रकरणी याची साक्ष घेण्यात यावी असा समितीने निर्णय घेतला.

**३.३ साक्षीच्या वेळी समितीला भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे खालील मुद्यांबाबत जिल्हा परिषदेकडून अधिक माहिती मागविली.**

१. अहमदनगर, जामखेड व पाथर्डी पंचायत समितीमध्ये ग्रामसेवकाने ९२ लाख रुपयांचा अपहार करुनही शासनाने परत त्यांना कामावर घेतले याची सर्वसाधारण कारणे काय आहेत, याबाबत खुलासा करावा.

२. सदर अपहार प्रकरणाची सद्य:स्थिती काय आहे.

**उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेकडून खालील प्रमाणे अधिक माहिती प्राप्त झाली.**

पंचायत समिती पाथर्डी येथील ग्रामसेवक श्री.बी.एम.रणशिंग यांनी ग्रामपंचायत टाकळीमानुर, चिंचपुर इजदे, मोंहटा, करोडी व तिनखडी या ग्रामपंचायतींमध्ये ९२,७३,७२४/- रुपयाचा कायमस्वरुपी अपहार व रक्कम रु.५,७४,०२५/- रुपयांचा संशयींत अपहार केलेला असून त्यांना सदर प्रकरणी सेवानिलंबित करण्यात आलेले होते. सदर प्रकरणी मा. सहाय्यक आयुक्त (चौकशी) नाशिक विभाग नाशिक यांनी खातेनिहाय चौकशी पुर्ण केलेली असुन श्री.बी.एम.रणशिंग यांना चौकशी अंती मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांचेकडील आदेश क्रमांक साप्रवि-२/ग्रापं-३/३६३/२०१२ दि.११/१०/२०१२ अन्वये सेवेतुन बडतर्फ करण्यात आलेल आहे.

तसेच त्यांचे विरुध्द सदर प्रकरणी पंचायत समिती पाथर्डीने खालीलप्रमाणे गुन्हे दाखल केलेले आहे.

| गुरनं. | कलम | कोर्ट केस क्र. | ख.पा.दि. |
|---|---|---|---|
| १) गुरनं/आय-५५/०८ | भा.दं.वि.कलम ४०९, २०१ | आरटीसी ४८/१० | दि.३/३/२०१२ |
| २) गुरनं/आय-२०५/०८ | भा.दं.वि.कलम ४०९, २०१ | आरटीसी ४८/१० | दि.११/३/२०१० |
| ३) गुरनं/आय-२०६/०८ | भा.दं.वि.कलम ४०९, २०१ | आरटीसी ४८/१० | दि.११/३/२०१० |

| | | | |
|---|---|---|---|
| ४) गुरनं/आय-२१२/०८ | भा.दं.वि.कलम ४०९, २०१ | आरटीसी ४८/१० | दि.११/३/२०१० |

वरील प्रमाणे संबंधितावर गुन्हे दाखल करण्यात आलेले असुन सध्या प्रकरण न्याय प्रविष्ट आहे.

**३.४ विभागीय सचिवांची साक्ष :-**

समितीने अहमदनगर जिल्हा परिषदेसंदर्भात पाथर्डी पंचायत समितीला दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने दिनांक ६ फेब्रुवारी, २०१३ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली.

साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, अहमदनगर, जामखेड, पाथर्डी या पंचायत समितींमध्ये ग्रामसेवकाने ९२ लाखांचा अपहार करुनही शासनाने त्यांना पुन्हा कामावर घेण्याची कारणे काय आहेत व सदरच्या प्रकरणाची सद्य:स्थिती काय आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदरचा विषय तीन पंचायत समित्यांमधील असुन पंचायत समिती नगरमध्ये अपहार प्रकरणी श्री.एस.एस.वाघमारे, ग्रामसेवक यांची विभागीय चौकशी करुन मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दिनांक ११/१०/२०१२ च्या आदेशान्वये सेवेतून बडतर्फ करण्यात आलेले आहे. श्री.बोर्डे यांची खातेनिहाय चौकशी झाली असुन त्यांना सेवेतून सक्तीने सेवानिवृत्त का करण्यात येऊ नये अशी अंतिम कारणे दखवा नोटीस दिलेली आहे. यांसदर्भात संबंधितांवर एफ.आय.आर. देखील दाखल करण्यात आलेला आहे. सदर प्रकरणातील अपहाराची रक्कम रुपये ६,६४,३४६ आणि रुपये ६२,३०० अद्याप येणे बाकी आहे. दोन्ही प्रकरणे न्यायप्रविष्ट असून दोषींना कामावर घेण्यात आलेले नाही असे समितीस सांगितले तसेच जामखेड पंचायत समितीअंतर्गत ग्रामपंचायत खर्डा व जवळा या ठिकाणी श्री.रणशिंग हे पदावर कार्यरत असताना त्यांनी अनुक्रमे रु.१,२५,०००/- आणि रु.४,७६०/- इतक्या रक्कमेचा अपहार केला असल्याने त्यांची खातेनिहाय चौकशी करुन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांना सेवेतून बडतर्फ केले होते. तथापि अप्पर आयुक्त नाशिक विभाग, नाशिक यांनी त्यांच्या आदेशान्वये सन २००४ मध्ये जिल्हा परिषद सेवेत पुन्हा कामावर घेतले. तसेच श्री.रणशिंग यांनी पाथर्डी पंचायत समितीध्ये असताना ९२ लाखांचा अपहार केला त्यांची पुन्हा विभागीय चौकशी करुन दिनांक ११/१०/२०१२ रोजी बडतर्फ केले व त्यावर अप्पर आयुक्त, नाशिक

विभाग यांचेकडे त्यांनी अपिल केले आहे, असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस सांगितले. एक व्यक्ती वारंवार चुक करीत आहे आणि पुन्हा त्यास नोकरीवर घेतले जाते यासंदर्भात विभागीय सचिवांनी लक्ष घालावे असे समितीने सांगितले असता सदरचे प्रकरण गंभीर असुन असे प्रकार खपवून घेतले नाही पाहिजे असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

**३.५ अभिप्राय व शिफारशी :-**

अहवाल वर्षात पंचायत समिती पाथर्डीमध्ये गैरव्यवहाराची तीन प्रकरणे आढळून आली आहेत त्यातील एक ग्रामसेवक कार्यरत आहे तर दोन निलंबित आहे. तसेच एकूण ४२ प्रकरणांपैकी ९ प्रकरणी वसुली करण्यात आली असुन उर्वरित प्रकरणांची वसुलीची कार्यवाही चालू आहे. उक्त प्रकरणी ग्रामसेवकांनी अपहार/गैरव्यवहार केलेले आहे ते दोषी आहेत त्यांचेकडून अपहार झालेल्या रक्कमेची वसुली करुन निलंबित केले जाणे व पुन्हा कामावर घेतले जाणे म्हणजेच चुका केल्या तरी शिक्षा नाही असे होत आहे. सदरचे प्रकरणे गंभीर असुन याकडे हेतूपुर्वक व जाणिवपुर्वक दोषींना शिक्षा केली जात नाही असे समितीचे मत झाले आहे. **समिती अशी शिफारस करते की, ज्या व्यक्तींनी अपहार-गैरव्यवहार केला आहे त्यांचेकडून वसुली करुन घ्यावीच परंतु त्यांचेवर कायदेशीर कारवाई करुन शिक्षा करण्यात यावी. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी.**

श्री.रणशिंग हे ग्रामसेवक वारंवार अपहार/गैरव्यवहार करित आहेत त्यांना मुख्य कार्यकारी अधिकारी बडतर्फ करीत आहेत. परंतु आयुक्त कार्यालयाकडून त्यांना पुन्हा कामावर घेतले जात आहे. एखादी व्यक्ती वारंवार तीच चुक करते आणि त्याला शिक्षा न करता पुन्हा नोकरीवर घेतले जाते सदरची बाब निश्चितच खेदजनक आहे. ग्रामसेवक सेवानिवृत्त झाल्यावर सेवानिवृत्तीच्या वेळी मिळणाऱ्या रक्कमेपेक्षा जास्त रक्कम अपहारातून मिळत आहे. अपहार/गैरव्यवहार केल्याप्रकरणी संबंधित दोषींना कोणतीही शिक्षा केली जात नाही, त्यामुळे पुढेही अशा वारंवार चुका होतात. ग्रामसेवक विचार करतो की, मी संपूर्ण नोकरी केल्यावरही एवढी रक्कम मला मिळू शकत नाही आपण एवढी मोठी रक्कम एकदाच घेतली तर नोकरी करण्याची गरज भासणार नाही अशी प्रवृत्ती मोठ्याप्रमाणावर वाढू लागली आहे. श्री.रणशिंग यांचे प्रकरणी वेळीच कायद्यानुसार कारवाई झाली असती तर त्यांनी पुन्हा असा गुन्हा केला

नसता तथापि आयुक्त कार्यालयाकडे अपिल केले आणि तेथील अधिकारी/कर्मचारी यांनी स्वहित लक्षात घेऊन त्यांना पुन्हा नोकरीवर घेण्याचे आदेश दिले सदरची बाब गंभीर स्वरुपाची आहे. **समिती अशी शिफारस करते की, उपरोक्त प्रकरणी श्री.रणशिंग यांना पुन्हा कामावर घेण्याबाबत आयुक्त कार्यालयातील ज्या अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांना पुर्ननियुक्तीचे आदेश दिले त्यांचेवर गंभिर स्वरुपाची कारवाई करण्यात यावी तसेच रणशिंग यांनी केलेले अपिल तात्काळ निकाली काढण्याची कार्यवाही करावी तसेच त्यांचेवर फौजदारी स्वरुपाची कारवाई करण्यात यावी तसेच अपहार केलेली रक्कम आयुक्त कार्यालयातील जबाबदार असणारे अधिकारी/कर्मचारी आणि श्री.रणशिंग यांचेकडून वसुल करण्यात यावी याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावा.**

परिशिष्ट

समितीच्या बैठकींचे संक्षिप्त कार्यवृत्त

## मंगळवार, दिनांक १४ जून, २०११

## स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, जालना

### उपस्थिती

१. श्री.बबनराव शिंदे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. श्री.हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, वि.स.स.

३. श्री.प्रशांत ठाकूर, वि.स.स.

४. श्री.दिलीपकुमार सानंदा, वि.स.स.

५. श्री.भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.

६. श्री.बच्चु उर्फ ओमप्रकाश कडू, वि.स.स.

७. श्री.बापुसाहेब पठारे, वि.स.स.

८. डॉ.खुशाल बोपचे, वि.स.स.

९. श्री.सुरेश खाडे, वि.स.स.

१०. श्री.विष्णु सावरा, वि.स.स.

११. श्री.विजयराव औटी, वि.स.स.

१२. श्री.दादाजी भुसे, वि.स.स.

१३. श्री.नितीन भोसले, वि.स.स.

१४. प्रा.सुरेश नवले, वि.प.स.

१५. श्री.विक्रम काळे, वि.प.स.

१६. श्री.सय्यद पाशा पटेल, वि.प.स.

१७. श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

### महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव

### ग्रामविकास विभाग

श्री.दि.ना.देशपांडे, कक्ष अधिकारी

### स्थानिक निधी लेखा, मुंबई

श्री.आर.बी.भागवत, मुख्य लेख परीक्षक

**जिल्हा परिषद अधिकारी**

श्री.बी.राधाकृष्णन, मुख्य कार्यकारी अधिकरी

श्री.पी.आर.सवडे, (प्र) उप मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री.किरणकुमार धोत्रे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

श्री.आनंद गंजेवार, (प्र) प्रकलप संचालक, जि.ग्रा.वि.यं. व कृषि विकास अधिकारी

श्री.पी.आर.सवडे, उप मुख्य कार्यकारी अधिकरी (सा)

श्री.ए.एस.शेंगुलवार, उप मुख्य कार्यकारी अधिकरी (पं)

श्रीमती वर्षा पवार (प्र) उप मुख्य कार्यकारी अधिकरी, बा.क.

डॉ.श्रीमती एल.आर.घोडगे, जिल्हा आरोग्य अधिकारी

श्री.पी.एम.कांबळे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकरी

श्री.जी.एम.साळवे, पशुधन विकास अधिकारी (तां.)

श्री.जी.एम.कांबळे, शिक्षणाधिकारी प्राथमिक

श्री.एस.आर.शिंदे, शिक्षणाधिकारी माध्यमिक

श्री.ढवळे, कार्यकारी अभियंता, सर्व शिक्षा अभियान

श्री.ए.वाय.गुंजाळे, कार्यकारी अभियंता, बांधकाम

श्री.अविनाश रणखांब, जिल्हा पुरवठा अधिकारी

श्री.आर.जे.कोयलवार, (प्र) कार्यकारी अभियंता सिंचन

श्री.एस.एस.कदम, कार्यकारी अभियंता (ग्रापापु)

श्री.तांगडे, तत्कालीन कार्यकारी अभियंता (ग्रापापु)

श्री.ओ.डी.बोडखे, उप कार्यकारी अभियंता (ग्रापापु)

श्री.जे.एम.शेख, समाजकल्याण अधिकारी

श्री.सी.एस.सोनावणे, जिल्हा कृषि अधिकारी (विघयो)

श्री.आर.एन.चौधरी, जिल्हा कृषि अधिकारी (सा)

डॉ.ए.बी.जगताप, वै.अ.जिल्हा प्रशिक्षण संघ, जालना

श्री.पी.एम.भावसार, (गविअ) जालना

श्रीमती वर्षा पवार, गट विकास अधिकारी, बदनापूर

श्री.एस.ए.इंगळे, गट विकास अधिकारी, अंबड

श्री.वाय.आर.जवादे, गट विकास अधिकारी, घनसावंगी,

श्री.एन.एस.पीतळे, गट विकास अधिकारी, परतूर व मंठा

श्री.आर.एस.लोखंडे, गट विकास अधिकारी, भोकरदन

श्री.बी.टी.बायस, गट विकास अधिकारी, जाफ्राबाद

श्री.सुखदेव भेले, तत्कालीन उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बाक) (सेवा निवृत्त)

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने जालना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २००५-२००६ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील जालना जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक २१ फेब्रुवारी, २०१२**

**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, भंडारा**

**उपस्थिती :**

१. श्री.बबनराव शिंदे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. श्री.हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, वि.स.स.

३. श्री.भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.

४. श्री.बापूसाहेब पठारे, वि.स.स.

५. डॉ.खुशाल बोपचे, वि.स.स.

६. श्री.सुरेश खाडे, वि.स.स.

७. श्री.विष्णु सावरा, वि.स.स.

८. श्री.अनिल राठोड, वि.स.स.

९. श्री.विजयराव औटी, वि.स.स.

१०. श्री.दादाजी भुसे, वि.स.स.

११. प्रा.सुरेश नवले, वि.स.स.

१२. श्री.विक्रम काळे, वि.प.स.

१३. ॲड. उषा दराडे, वि.प.स.

१४. श्री.सय्यद पाशा पटेल, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव

**ग्रामविकास विभाग**

श्री.प्रियदर्शन कांबळे, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरिक्षा कार्यालय**

श्री.र.भा.भागवत, संचालक

**जिल्हा परिषद, भंडारा**

श्री.अरुण डुबे, मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री.डी.एस.पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री.पंकज गिरी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

श्री.एन.बी.यादव, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य)

श्री.राजेश कुलकर्णी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)

कु.प्रमिला प्रा.जाखलेकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (म.बा.क.)

श्री.एस.के.सांगोळे, प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यं.

डॉ.एम.बी.गणवीर, जिल्हा आरोग्य अधिकारी

श्री.आर.आर.चोपडे, कार्यकारी अभियंता (बांधकाम)

श्री.पी.एल.खंडाते, कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पु)

डॉ.एस.जी.चव्हाण, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

श्री.व्ही.टी.गऱ्हाटे, शिक्षाणाधिकारी (प्राथमिक)

श्री.नारायण जोशी, शिक्षणाधिकारी (माध्य) तथा प्रभारी शि.अ.(निरंतर शिक्षण)

श्री.एम.बी.शेंडे, कृषी विकास अधिकारी

श्री.राजेश पांडे, समाजकल्याण अधिकारी

श्री.पी.एन.मंगरुळकर, उप अभियंता, भु.स.वि.यं.

श्री.आर.एस.दडमल, गट विकास अधिकारी, पं.स. भंडारा

सौ.मंजुषा ठवकर, गट विकास अधिकारी, पं.स. तुमसर

श्री.आर.व्ही.राठोड, गट विकास अधिकारी, पं.स. लाखांदूर

श्री.राजेश बागडे, गट विकास अधिकारी, पं.स. लाखनी

श्री.लिल्हारे, गट विकास अधिकारी, पं.स. साकोली

श्री.आर.एम.टेटे, गट विकास अधिकारी, पं.स.पवनी

श्री.सी.जी.चव्हाण, गट विकास अधिकारी, पं.स.मोहाडी

सौ.पी.यु.वानखेडे, उप अभियंता, बांधकाम उपविभाग क्र.१

व इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते.

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने भंडारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २००५-२००६ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील भंडारा जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०१२**

**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, अहमदनगर**

**उपस्थिती**

१. श्री.बबनराव शिंदे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. श्री.भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.

३. श्री.बापुसाहेब पठारे, वि.स.स.

४. डॉ.खुशाल बोपचे, वि.स.स.

५. श्री.सुरेश खाडे, वि.स.स.

६. श्री.विष्णु सावरा, वि.स.स.

७. श्री.अनिल भैय्या राठोड, वि.स.स.

८. श्री.विजयराव औटी, वि.स.स.

९. श्री.दादाजी भुसे, वि.स.स.

१०. श्री.नितीन भोसले, वि.स.स.

११. प्रा.सुरेश नवले, वि.प.स.

१२. श्री.विक्रम काळे, वि.प.स.

१३. ॲड.उषा दराडे, वि.प.स.

१४. श्री.सय्यद पाशा पटेल, वि.प.स.

१५. श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव

श्री.प्रदीप मयेकर, कक्ष अधिकारी

**ग्रामविकास विभाग, मंत्रालय**

श्री.विजय भोसले, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखा संचालनाय, मुंबई**

श्री.र.ना.भागवत, संचालक

श्री.व्ही.पी.सोनावणे, सहाय्यक संचालक, पंरास,

स्थानिक निधी लेखा परीक्षा संचालनालय, मुंबई

श्री.मा.श.नागरगोजे, सहसंचालक,

स्थानिक निधी लेखा, नाशिक विभाग.

**अहमदनगर जिल्हा परिषद अधिकारी**

श्रीमती रुबल अग्रवाल, मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री.रवींद्र पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री.विवेक गुजर, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा

श्री.कृष्णराव साळुंखे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

श्री.अशोक पावडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र)व (बाल कल्याण)

श्री.जगन्नाथ भोर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.)

डॉ.कारभारी खरात, जिल्हा आरोग्य अधिकारी

श्री.दिनकर टेमकर, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

श्री.नवनाथ औताडे, शिक्षणाधिकारी (मा.) (प्र.)

श्री.संभाजी गायकवाड, कृषी विकास अधिकारी

डॉ.सुनील तुंबारे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी व समाज कल्याण अधिकारी (प्र.)

श्री.दिलीप पालवे, कार्यकारी अभियंता, सा.बा. (उत्तर)

श्री.पोपट खंडागळे, कार्यकारी अभियंता, सा.बा. (दक्षिण)

श्री.शिवशंकर निकम, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा

श्री.प्राणसिंह बिसेन, कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे

श्री.नवनाथ औताडे, उप शिक्षणाधिकारी (मा)

श्रीमती माया शिर्के, वरिष्ठ लेखाधिकारी

श्री.पोपट काळे, उप शिक्षणाधिकारी (सर्व शिक्षा अभियान)

सर्व गट विकास अधिकारी व इतर संबंधित अधिकारी

श्री.पी.एम.राऊत, माजी गट विकास अधिकारी, राहुरी

श्री.मुरलीधर वाघ, माजी गट विकास अधिकारी, कोपरगाव

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने अहमदनगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २००५-२००६ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील अहमदनगर जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक २९ नोव्हेंबर, २०११**

**स्थळ : विधान भवन, मुंबई (सचिवांची साक्ष)**

**उपस्थिती**

१. श्री.बबनराव शिंदे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. श्री.विष्णु सावरा, वि.स.स.

३. श्री.विक्रम काळे, वि.प.स.

४. ॲड.उषा दराडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव

श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव

**स्थानिक निधी लेखा परीक्षा**

श्री. र.भा. भागवत, संचालक

**विभागीय प्रतिनिधी**

श्रीमती मालिनी शंकर, प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

श्री.व्ही.गिरीराज, प्रधान सचिव, रोहयो,

श्री.सुधीर ठाकरे, सचिव, ग्रामविकास विभाग

श्री.भुषण गगराणी, सचिव, आरोग्य विभाग

श्री.श्यामलकुमार मुखर्जी, सचिव (बांधकाम), सार्वजनिक बांधकाम विभाग

श्री.श्रीकांत देशपांडे, सचिव, वित्त विभाग, लेखा व कोषागारे,

श्री.द.चिं.सुर्यवंशी, मुख्य अभियंता तथा विशेष कार्य अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, श्री.गि.दि.भालेराव, सह संचालक (अतां) सार्वजनिक आरोग्य विभाग,

श्री.दि.ग.मोरे, उप सचिव, ग्रामविकास विभाग

श्री.सुनिल चव्हाण, उप सचिव, जलसंधारण विभाग

**जिल्हा परिषद, जालना**

श्री.बी.राधाकृष्णन, मुख्य कार्यकारी अधिकरी

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २००५-२००६ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात जालना जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, प्रधान सचिव, जलसंधारण विभाग, सचिव, ग्रामविकास विभाग, सचिव, आरोग्य विभाग, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, वित्त विभाग, मुख्य अभियंता तथा विशेष कार्य अधिकारी, पाणी पुरवठा स्वच्छता विभाग, सहसंचालक (अता) सार्वजनिक आरोग्य विभाग, उप सचिव, ग्रामविकास विभाग, सचिव, जलसंधारण यांची साक्ष घेतली.

## बुधवार, दिनांक ८ ऑगस्ट, २०१२

## स्थळ : विधान भवन, मुंबई (सचिवांची साक्ष)

**उपस्थिती :**

१. श्री.चंद्रकांत दानवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. श्री.काशिराम पावरा, वि.स.स.

३. श्री.वैजनाथ शिंदे, वि.स.स.

४. श्री.विजय खडसे, वि.स.स.

५. श्री.भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.

६. श्री.दिलीप माने, वि.स.स.

७. श्री.भारत भालके, वि.स.स.

८. श्री.सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

९. श्री.राजकुमार बडोले, वि.स.स.

१०. श्री.संजय राठोड, वि.स.स.

११. श्री.सुर्यकांत दळवी, वि.स.स.

१२. श्री.प्रकाश भोईर, वि.स.स.

१३. श्री.विक्रम काळे, वि.प.स.

**निमंत्रित**

१४. श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री.भाऊसाहे कांबळे, सह सचिव

श्री.गंगाधर कोहळे, उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी

श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव

**स्थानिक निधी लेखा परिक्षा, नवी मुंबई**

श्री.का.मा.विधाते, संचालक

**विभागीय प्रतिनिधी**

श्री.सहारिया, अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग

श्री.गिरीराज, प्रधान सचिव, जलसंधारण विभाग

श्री.संधू, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग

श्रीमती मालिनी शंकर, प्रधान सचिव, पाणी पुरवठा विभाग

श्री.टी.एस.बेंजामिन, अपर मुख्य सचिव, आरोग्य विभाग

श्रीमती सीमा उकार्डे, सह सचिव

श्री.ना.रा.रौराहे, सह सचिव

डॉ.मल्लिनाथ कलशेट्टी, उप सचिव, ग्रामविकास विभाग

श्री.सुनिल चव्हाण, उप सचिव, लसंधारण विभाग

श्री.एकनाथ मोरे, उप सचिव, ग्रामविकास विभाग

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २००५-२००६ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात भंडारा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, प्रधान सचिव, जलसंधारण विभाग, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, प्रधान सचिव, पाणी पुरवठा विभाग, अपर मुख्य सचिव, आरोग्य विभाग, उप सचिव, ग्रामविकास विभाग, उप सचिव, जलसंधारण विभाग, विभाग यांची साक्ष घेतली.

## बुधवार, दिनांक ६ फेब्रुवारी, २०१३

## स्थळ : विधान भवन, मुंबई (सचिवांची साक्ष)

**उपस्थिती :**

१. श्री.चंद्रकांत दानवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. श्री.वैजनाथ शिंदे, वि.स.स.

३. श्री.विजय खडसे, वि.स.स.

४. श्री.सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

५. श्री.संजय जाधव, वि.स.स.

६. श्री.विक्रम काळे, वि.प.स.

७. श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री.गंगाधर कोहळे, उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी

श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव

**स्थानिक निधी लेखा परिक्षा कार्यालय**

श्री.के.एम विधाते, संचालक

**विभागीय प्रतिनिधी**

श्री.व्ही.गिरीराज, प्रधान सचिव, रोहयो विभाग

श्री.एस.एस.संधू, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग

श्री.मुखर्जी, सचिव (बांधकाम), सार्वजनिक बांधकाम विभाग

श्री.दि.ग.मोरे, सह सचिव, ग्रामविकास विभाग

श्री.कांतीलाल उमाप, उप सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग

श्री.एम.पी.तुम्मोड, उप आयुक्त (रोहयो) नाशिक

श्री.जी.के.नाईक, सह संचालक, आरोग्य सेवा

श्री.पी.यू.बिसेन, कार्यकारी अभियंता, ल.पा.वि.जि.प.अहमदनगर

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २००५-२००६ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात अहमदनगर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी प्रधान सचिव, रोहयो विभाग, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, सचिव (बांधकाम), सार्वजनिक बांधकाम विभाग, सह सचिव, ग्रामविकास विभाग, उप सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, उप आयुक्त (रोहयो) नाशिक, सह संचालक, आरोग्य सेवा, कार्यकारी अभियंता, ल.पा.वि.जि.प.अहमदनगर यांची साक्ष घेतली.

## दिनांक - ०९ एप्रिल, २०१३
## स्थळ : विधान भवन, मुंबई
## उपस्थिती

**समिती प्रमुख**

१. श्री.चंद्रकांत दानवे, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री.काशिराम पावरा, वि.स.स.

३. श्री.वैजनाथ शिंदे, वि.स.स.

४. श्री.प्रशांत ठाकूर, वि.स.स.

५. श्री.विजय खडसे, वि.स.स.

६. श्री.भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.

७. श्री.दिलीप माने, वि.स.स.

८. श्री.भारत भालके, वि.स.स.

९. श्री.उदय सामंत, वि.स.स.

१०. श्री.सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

११. श्री.बापूसाहेब पठारे, वि.स.स.

१२. श्री.आण्णा बनसोडे, वि.स.स.

१३. श्री.दादाराव केचे, वि.स.स.

१४. श्री.राजकुमार बडोले, वि.स.स.

**१५. *श्री.जयकुमार रावल, वि.स.स.**

१६. श्री.विष्णू सावरा, वि.स.स.

१७. श्री.संजय (बंडू) जाधव, वि.स.स.

१८. श्री.संजय राठोड, वि.स.स.

१९. श्री.सुर्यकांत दळवी, वि.स.स.

२०. श्री.प्रकाश भोईर, वि.स.स.

२१. श्री.एम.एम.शेख, वि.प.स.

२२. डॉ.सुधीर तांबे, वि.प.स.

२३. श्री.दिपक साळुंखे, वि.प.स.

२४. श्री.विक्रम काळे, वि.प.स.

२५. श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

**निमंत्रीत**

२६. श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
श्री.भाऊसाहेब कांबळे, अतिरिक्त सचिव
श्री.गंगाधर कोहळे, उप सचिव
श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव
श्री.रंगनाथ खैरे, कक्ष अधिकारी

**संक्षिप्त कार्यवृत्त**

समितीने बैठकीत चौदाव्या अहवालाच्या प्रारुपावर विचार करुन ते किरकोळ सुधारणासह संमत केले.